स्थापना : १९५०

# कनिष्ठ महाविद्यालय व्यवसाय अभ्यासक्रम (HSCVC)

## माहिती पुस्तिका

## २०२४-२५


बी, वॉर्ड, सुभाष रोड, कोल्हापूर–416012

फोन : 0231-2642540, 2643840

फॅक्स : 2642340

Website: www.gkgcollege.edu.in

email : gkgcollege1950@gmail.com




।। बहुजन हिताय, बहुजन सुखाय ।।

शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर संचलित

# गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर

NAAC RE-ACCREDITED WITH **'B' GRADE** (**CGPA 2.48**) (**3rd Cycle**)

**शिवाजी विद्यापीठाशी संलग्न**

- कला • वाणिज्य • विज्ञान • भू-शास्त्र-एम.एस्सी.,
- एम.फिल., • पीएच.डी. • बी.सी.ए. • बी.व्होक.



# आमचे प्रेरणा स्थान

आमचे श्रद्धास्थान



## नामदार गोपाळ कृष्ण गोखले

आदरणीय संस्थापक



## बॅ. बाळासाहेब खर्डेकर

Bar. at Law, Cambridge University


आदरणीय संस्थापक



संस्कृतपंडित, शिक्षणमहर्षि

## प्राचार्य एम.आर.देसाई

B.A (Hon.), L.L.B. (Mumbai)
M.Ed. (Leeds, London)



## कै. मा. श्री. व्ही. एल. पाटील (काका)

शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी चेअरमन,
माजी मंत्री, कर्नाटक राज्य



## कै. सौ. लीना रमेश सावंत

शिक्षण प्रसारक मंडळाच्या माजी चेअरमन

आमचे प्रेरणास्थान



## कै. श्रीमती सुशिलादेवी म. देसाई

आईसाहेब

आमचे प्रेरणास्थान



## परमपूज्य श्री दत्ताबाळ

अध्यात्मी गुरू (योगीराज)

आमचे प्रेरणास्थान



## कै. दिलीपराव म. देसाई

माजी आमदार,
माजी सचिव, शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर

# शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर

अध्यक्षा



श्रीमती शिवानी दि. देसाई

उपाध्यक्ष



श्री. शिवाजीराव जी. सावंत

चेअरमन



प्रा. डॉ. मंजिरी अजित मोरे

सेक्रेटरी



प्रा. जयकुमार म. देसाई

पेट्रन, सदस्य



श्री. दौलत उर्फ
बाळासाहेब ज. देसाई

सदस्या



सौ. अंजली जयकुमार
देसाई



प्रा. व्ही. डी. मोहिते



श्री. लक्ष्मण स. डेळेकर



प्रा. पी. बी. झावरे



मा. श्री. रमेश सावंत



मा. श्री. ए. ए. पन्हाळकर



डॉ. आर. बी. भुयेकर
प्रभारी प्राचार्य



श्री. एन. टी. पाटील
उपप्राचार्य



माजी विद्यार्थी मेळाव्यात माजी विद्यार्थी व महाराष्ट्र केसरी श्री. विष्णू जोशीकर यांच्या हस्ते मा. सेक्रेटरी जयकुमार देसाई साहेब यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करताना व्यासपीठावरील इतर मान्यवर.




शिक्षण प्रसारक मंडळाच्या कोल्हापूर संस्थेच्या चेअरमन मा. डॉ. मंजिरी अजित मोरे यांना सिंगापूर येथे 'ग्लोबल सखी अचिव्हमेंट अवॉर्ड २०२४' ने सन्मानित करताना लोकमतचे संपादक



मा. श्री. दौलत जयकुमार देसाई (पेट्रन कौन्सिल सदस्य) यांच्या हस्ते प्रिन्सिपॉल एम. आर. देसाई मेमोरियल शिल्ड इलोकेशन्स पारितोषिक स्वीकारताना कु. अन्विता निकम सोबत शिक्षण प्रसारक मंडळाच्या चेअरमन डॉ. सौ. मंजिरी अजित मोरे प्र. प्राचार्य डॉ. आर. बी. भुयेकर, उपप्राचार्य एन. टी. पाटील, माजी प्राचार्य डॉ. पी. के. पाटील, लेफ्टनंट डॉ. डी. के. नरळे सर, कौन्सिल सदस्य प्रोफेसर पी. बी. झावरे.

# प्रास्ताविक

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रातील बहुजन समाजाला साक्षर व समृद्ध करण्याच्या उदात्त हेतूने ''बहुजन हिताय बहुजन सुखाय'' हे ब्रीदवाक्य घेऊन थोर शिक्षणतज्ज्ञ बॅ. बाळासाहेब खर्डेकर व संस्कृतपंडित शिक्षणमहर्षि प्राचार्य एम. आर. देसाई साहेब यांनी ''शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर'' या संस्थेची स्थापना केली. महाराष्ट्र व कर्नाटक राज्यामध्ये या संस्थेच्या अनेक शाखा ज्ञानदानाचे कार्य अखंडपणे करत आहेत.

कोल्हापूर शहराच्या सामाजिक, सांस्कृतिक क्रीडा परंपरेमध्ये मोलाचे योगदान देणारे महाविद्यालय म्हणून गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय ओळखले जाते. पारंपारिक प्रणाली बरोबरच आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित नवीन शिक्षण प्रणाली गोखले महाविद्यालयाने स्वीकारली असून संगणक कोर्सेसच्या सुविधा सर्व सामान्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत.

६९ वर्षांची शैक्षणिक परंपरा लाभलेले, गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय शहराच्या अगदी मध्यवर्ती असल्यामुळे सर्वांना सोयीचे आणि अभ्यास व अभ्यासेत्तर उपक्रमांना विविध प्रकारची संधी देणारे, असे नावाजलेले महाविद्यालय आहे. या महाविद्यालयात खालील अभ्यासक्रमांचे शिक्षण उत्तम प्रकारे दिले जाते.

१) कला (Arts) – ११ वी ते बी.ए.

२) वाणिज्य (Commerce) – ११ वी ते बी.कॉम.

३) विज्ञान (Science) – ११ वी ते बी.एस्सी.

४) एम. एस्सी. भू–शास्त्र (Geology)

५) उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (H.S.C. Vocational Course)

६) B.Sc. Computer Science

७) B.C.A.

८) Bachelor of Vocation (B.Voc.)

शिक्षणाची उत्कट इच्छा बाळगणाऱ्या समाजातील सर्व थरातल्या मुलांना आणि मुलींना शिक्षणाची उत्कृष्ट सोय उपलब्ध करून देण्यासाठी, शिक्षण प्रसारक मंडळाचे गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय सन १९५० मध्ये कागल येथे सुरू झाले. नंतर सन १९५४ साली कोल्हापूर येथे हे महाविद्यालय स्वत:च्या सुसज्ज आणि भव्य इमारतीत भरू लागले. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी वैयक्तिक लक्ष, आपापल्या विषयातील तज्ञ व अनुभवी असलेला प्राध्यापक वर्ग, सुसज्ज प्रयोगशाळा, समृध्द ग्रंथालय, निसर्गरम्य परिसर, विविध प्रकारच्या देशी–विदेशी खेळांबाबत व्यक्तिगत मार्गदर्शन व सांस्कृतिक, राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी.इ. क्षेत्रात संधी दिली जाते. यामुळे या महाविद्यालयाने अभ्यास, कला, क्रीडा या सर्वच क्षेत्रात दैदिप्यमान यश संपादन केले आहे. आज जीवनाच्या विविध क्षेत्रात सर्वार्थाने चमकणाऱ्या व्यक्तीमध्ये अनेकजण गोखले महाविद्यालयाचेच विद्यार्थी आहेत. ही परंपरा अबाधितपणे चालूच राहिलेली आहे. हुशार विद्यार्थ्यांकडे जसे येथे खास लक्ष पुरविले जाते. तसेच अभ्यासात मागे राहणाऱ्या विद्यार्थ्यांकडेही विशेष लक्ष पुरविले जाते. कोणत्याही क्षेत्रात रूची असणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या संधी आणि सवलती उपलब्ध करून देणाऱ्या आणि उज्ज्वल यशाची परंपरा असणाऱ्या येथील विलोभणीय उद्यानाच्या सानिध्यातील विद्याभ्यास हा आनंददायी अनुभव असतो. त्यामुळे गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालयात प्रवेश घेताना अभिमानच वाटेल.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे विविध अभ्यासक्रमही या महाविद्यालयातील केंद्राद्वारे उपलब्ध करून दिले जातात.

प्राचार्य,
गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज, कोल्हपूर

## कनिष्ठ, वरिष्ठ आणि पदव्युत्तर महाविद्यालयाच्या वेळा

| | | |
|---|---|---|
| कला, वाणिज्य आणि एच. एस. सी. व्होकेशनल विभाग | – | सकाळी ७.३० पासून |
| विज्ञान विभाग | – | सकाळी १०.२० पासून |
| बी. सी. ए. विभाग | – | सकाळी ७.३० पासून |

## कार्यालयीन कामकाज वेळ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पैसे देवघेव | : | सोमवार ते शुक्रवार | : | सकाळी १०.०० ते दुपारी २.०० |
| | | शनिवार | : | सकाळी १०.०० ते दुपारी १.०० |
| पत्रव्यवहार | : | सोमवार ते शुक्रवार | : | सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० |
| | | शनिवार | : | सकाळी १०.०० ते दुपारी २.३० |

## विद्यार्थ्यांना व पालकांना सूचना

१) १५ जून २०२४ पासून महाविद्यालयाचे सर्व वर्ग नियमित सुरू होत आहेत. पालकांनी विद्यार्थ्यांना वेळेवर महाविद्यालयात पाठवावे.

२) प्रवेशाचे वेळी आयकार्ड साईजचे दोन फोटो देणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांनी फी सवलतीसंबंधी सर्व कागदपत्रे महाविद्यालयामध्ये प्रवेशावेळीच दिली पाहिजेत. उशिरा दिल्याने नुकसानीस महाविद्यालय जबाबदार असणार नाही.

३) प्रवेश घेतल्यानंतर ओळखपत्राची पूर्तता एक महिन्यात करणे आवश्यक आहे. डुप्लिकेट ओळखपत्रासाठी रू. १००/– दंड आकारला जाईल.

४) सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयात तासिका, प्रात्यक्षिक, पी.टी.चे तास व महाविद्यालयाच्या सर्व परीक्षांना नियमितपणे हजर असणे हा महाविद्यालयाच्या शिस्तीचा भाग आहे. जे विद्यार्थी परीक्षांना व तासांना गैरहजर राहतील व गैरवर्तन करतील त्यांचेवर नियमाप्रमाणे कारवाई केली जाईल. प्रसंगी प्रवेश रद्द केला जाईल.

५) महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ ओळखपत्र व वेळापत्रक असणे आवश्यक आहे. ओळखपत्राशिवाय महाविद्यालयाच्या आवारात फिरणे नियमबाह्य ठरेल आणि त्यास रू. १००/– दंड त्वरीत आकारला जाईल.

६) शिस्त हे महाविद्यालयाचे खास वैशिष्ट्ये आहे. विद्यार्थ्यांचा अभ्यास, उपस्थिती व त्यांचे महाविद्यालयातील व बाहेरील वर्तन याबाबतीत महाविद्यालयाने तयार केलेले नियम विद्यार्थी/विद्यार्थिनींना बंधनकारक राहतील.

७) वर्ग चालू असताना व्हरांड्यात किंवा महाविद्यालयाच्या आवारत रेंगाळता कामा नये व इतर वर्गांना आपल्या वर्तनाचा त्रास होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

८) महाविद्यालयाच्या आवारात व वर्गात मोबाईल वापरण्यास बंदी आहे. याचे उल्लंघन केल्यास कडक कारवाई केली जाईल.

९) महाविद्यालयाच्या मालमत्तेची (भिंत, दरवाजे, काचा, फळा, डेस्क, खेळाचे व प्रयोगशालेतील साहित्य, बगीचा, इ.) प्रत्येकाने काळजी घ्यावी. मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यास भरपाई द्यावी लागेल. शिवाय दंडात्मक कारवाईस सामोरे जावे लागेल.

१०) प्रत्येक विद्यार्थ्यांने आवश्यक त्या प्रमाणपत्राची मागणी विहित नमुन्यामध्ये करावी. उदा. बोनाफाईड, ओळखपत्र, शाळा सोडलेचा दाखला, गुणपत्रक इ. विहित नमुन्यातील अर्ज कार्यालयात मिळतात.

११) पालकांनी पालक सभेवेळी अथवा वेळोवेळी महाविद्यालयामध्ये येऊन आपल्या पाल्याच्या प्रगतीसंबंधी चौकशी करावी. वर्ष अखेरीस चौकशीस कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

१२) विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या नियमानुसार महाविद्यालयाच्या आवारात व वर्गात रॅगिंग करण्यास बंदी आहे. याचे उल्लंघन केल्यास कडक कारवाई केली जाईल.

१३) विद्यापीठ नियमानुसार महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन होणार नाही.

१४) ११ वी, १२ वी सायन्स विद्यार्थी – विद्यार्थिनींना बायोमेट्रिक आवश्यक करण्यात आले आहे.

डॉ. आर. बी. भुयेकर
प्रभारी प्राचार्य
गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज, कोल्हापूर.

प्रा. जयकुमार म. देसाई
सेक्रेटरी
शि. प्र. मंडळ कोल्हापूर.

# • कनिष्ठ महाविद्यालय •

## Junior College : उच्च माध्यमिक विभाग

### प्रवेश पात्रता : ११ वी आणि १२ वी कला-वाणिज्य-विज्ञान

१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा (इ. १० वी) उत्तीर्ण झालेले विद्यार्थी -विद्यार्थिनी ११वी प्रवेशास पात्र असतात.

२) जे विद्यार्थी १२ वी मध्ये प्रवेश घेऊ इच्छित असतील, त्यांनी अकरावी उत्तीर्ण झाल्याचा शाळा सोडलेचा दाखला व गुणतक्त्याची मूळ व झेरॉक्स प्रति आपल्या संबंधित महाविद्यालयाकडून आणणे आवश्यक आहे.

३) परजिल्ह्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर त्यांच्या जिल्ह्याच्या माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्याची स्वाक्षरी आणणे आवश्यक आहे.

४) महाराष्ट्र राज्याबाहेरील समकक्ष मंडळाची शालांत परीक्षा (इ. १० वी) इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य मंडळाकडून पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) मिळविण्यासाठी आवश्यक फॉर्म आणि पात्रता प्रमाणपत्राची आवश्यक ती फी भरावी लागेल. बाहेरील राज्यातून येऊन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी योग्य कागदपत्रासह आवश्यक असणारे सर्व दाखले प्रवेशावेळी देणे जरूरीचे आहे. तसेच बोर्डाच्या नियमानुसार वेळेत पात्रता न झालेस प्रवेश रद्द होईल याची नोंद घ्यावी.

५) जात पडताळणी प्रक्रिया ही इ. १२ वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच लागू असून सदरचे अर्ज दि. ---------- २०२४ पर्यंत कार्यालयात दाखवून मा. प्राचार्य यांचे शिफारस पत्र घेणे आवश्यक आहे.

६) इयत्ता १२ वी मध्ये रिपीटर विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

७) प्रवेश कायम करण्याचा अगर रद्द करण्याचा अंतिम निर्णय प्राचार्यांचा राहील व तो सर्वांवर बंधनकारक असेल.

८) प्रवेश अर्जामध्ये आधारकार्ड नंबरची नोंद करणे अत्यावश्यक आहे.

**प्रवेश अर्जासोबत आवश्यक दाखले (Eligibility Certificate)**

अ) शाळा सोडल्याचा दाखला (School Leaving Certificate) मूळप्रत.

ब) शालांत परीक्षेचे गुणपत्रक (Marks Statement) मूळप्रत व झेरॉक्स प्रत.

क) प्रवेश अर्जाबरोबर ओळखपत्राच्या आकाराचा फोटो देणे आवश्यक आहे.

ड) सवलतीचे दाखले- आर्थिक मागास वर्गातील विद्यार्थी, स्वातंत्र्य सैनिकांची मुले, प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांची मुले तसेच मुलींना फी सवलतीसाठी पालकांचे प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे. सोबत मा. तहसिलदारसो यांचा रू. १,००,०००/- पर्यंत उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

१) मुलींचे मोफत शिक्षणासाठी आवश्यक फॉर्मस् भरावेत.(प्रतिज्ञापत्र)

२) मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी मोफत शिक्षणासाठी आवश्यक फॉर्मस् भरावेत.

३) ए. टी. के. टी. च्या प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज भरावेत.

इ) मागासवर्गीय मुले व मुली यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन भरणेचे आहेत. शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर परस्पर ऑनलाईन जमा केली जाते. त्यासाठी पंजाब नॅशनल बँक, परीख पुला शेजारी, सी. बी. एस. कोल्हापूर येथे खाते उघडणे आवश्यक आहे.

ई) मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शाळा सोडलेचा दाखला, गुणपत्रक व जातीचे प्रमाणपत्र यांच्या प्रत्येकी ८ झेरॉक्स प्रती प्रथमच काढून ठेवाव्यात, कारण त्या दरवर्षी शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडाव्या लागतात. सदरचे अर्ज शासनाच्या वेबसाईटच्या तारखेप्रमाणेच भरणेचे आहे. अन्यथा त्यांना संपूर्ण वर्षाची फी भरावी लागेल. नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही.

फ) ज्यांच्या शाळा सोडलेल्या दाखल्यात जातीची नोंद योग्य प्रकारे झालेली नसेल त्यांनी कार्यालयात उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातील फॉर्म भरावेत.

* ११ वी मध्ये प्रवेश घेतेवेळी पूर्वीच्या शाळेच्या युडायस क्रमांक आणणे आवश्यक आहे.
टीप : अकरावीचे ओळखपत्र बारावीसाठी वापरावे. बारावीच्या विद्यार्थ्यांनी २०२४-२५ ची ॲडमिशन पावती दाखवून ग्रंथालयातून ओळखपत्र नूतनीकरण करून घेणे आवश्यक आहे. हरवलेस दंड आकारण्यात येईल.

## • अकरावी कला (Arts) •

### Junior College : उच्च माध्यमिक विभाग

| माध्यम : मराठी | | | महाविद्यालयाची वेळ : सकाळी ७.३० पासून |
|---|---|---|---|
| (खालीलपैकी कोणत्याही एका ग्रुप मधील सात विषय निवडावेत) | | | |
| | ए- ग्रुप | बी-ग्रुप | सी - ग्रुप |
| आवश्यक विषय | १) इंग्रजी | १) इंग्रजी | १) इंग्रजी |
| | २) पर्यावरण शिक्षण | २) पर्यावरण शिक्षण | २) पर्यावरण शिक्षण |
| | ३) मराठी | ३) मराठी | ३) मराठी किंवा हिंदी |
| ऐच्छिक विषय | ४) राज्यशास्त्र किंवा अर्थशास्त्र | ४) इतिहास | ४) इतिहास |
| | ५) मानसशास्त्र | ५) मानसशास्त्र किंवा हिंदी | ५) समाजशास्त्र |
| | ६) भूगोल | ६) भूगोल | ६) अर्थशास्त्र |
| | ७) इतिहास किंवा समाजशास्त्र | ७) समाजशास्त्र | ७) भूगोल किंवा राज्यशास्त्र |

## • अकरावी वाणिज्य (Commerce) •

### Junior College : उच्च माध्यमिक विभाग

| माध्यम : मराठी | | | | महाविद्यालयाची वेळ : सकाळी ७.३० पासून |
|---|---|---|---|---|
| (खालीलपैकी कोणत्याही एका ग्रुप मधील सात विषय निवडावेत.) | | | | |
| ११ वी वाणिज्य वर्गासाठी सन २०११-१२ पासून माहिती तंत्रज्ञान (Information Technology) विषय विनाअनुदान तत्वावर सुरू करण्यात आला आहे त्याची वेगळी फी भरावी लागेल. | | | | |
| | ए- ग्रुप | बी-ग्रुप | सी - ग्रुप | डी - ग्रुप (विना अनुदानित) |
| आवश्यक विषय | १) इंग्रजी | १) इंग्रजी | १) इंग्रजी | १) इंग्रजी |
| | २) पर्यावरण शिक्षण | २) पर्यावरण शिक्षण | २) पर्यावरण शिक्षण | २) पर्यावरण शिक्षण |
| | ३) मराठी/ हिंदी | ३) मराठी/ माहिती तंत्रज्ञान | ३) मराठी/ माहिती तंत्रज्ञान | ३) मराठी/ माहिती तंत्रज्ञान |
| ऐच्छिक विषय | ४) पुस्तक पालन आणि लेखाकर्म (अकौंऊंटन्सी) | ४) पुस्तक पालन आणि लेखाकर्म (अकोंऊंटन्सी) | ४) पुस्तक पालन आणि लेखाकर्म (अकौंऊंटन्सी) | ४) पुस्तक पालन आणि लेखाकर्म (अकोंऊंटन्सी) |
| | ५) व्यापार संघटन आणि व्यवस्थापन | ५) व्यापार संघटन आणि व्यवस्थापन | ५) व्यापार संघटन आणि व्यवस्थापन | ५) व्यापार संघटन आणि व्यवस्थापन |
| | ६) अर्थशास्त्र | ६) अर्थशास्त्र | ६) अर्थशास्त्र | ६) अर्थशास्त्र |
| | ७) चिटणीसाचा व्यवसाय (एस.पी.) किंवा भूगोल | ७) चिटणीसाचा व्यवसाय (एस.पी.) | ७) चिटणीसाचा व्यवसाय (एस. पी.) किंवा सहकार | ७) चिटणीसाचा व्यवसाय (एस. पी.) |

## ● अकरावी विज्ञान (Science) ●

**माध्यम** (Medium) **: इंग्रजी** (English) **महाविद्यालयाची वेळ : सकाळी १०.२० पासून**

**आवश्यक विषय : १) इंग्रजी २) मराठी किंवा हिंदी** (Marathi or Hindi) **किंवा** I.T. **(इलेक्ट्रॉनिक्स विषय नसणाऱ्यांसाठी)**
**३) पर्यावरण शिक्षण** (Environmental Education)

**ऐच्छिक विषय : खालीलपैकी कोणताही एकच ग्रुप निवडणेचा आहे.**

| Group - I | Group - II | Group - III | Group - IV |
|---|---|---|---|
| Physics | Physics | Physics | Physics |
| Chemistry | Chemistry | Chemistry | Chemistry |
| Mathematics | Mathematics | Biology | Mathematics |
| Biology | Geology | Geology | Electronics* |

टीप : १) ११ वी सायन्स या वर्गासाठी सन २०११–१२ पासून माहिती तंत्रज्ञान (Information Technology) विषय विनाअनुदानित तत्वावर सुरू करण्यात आलेला आहे. त्याची फी वेगळी भरावी लागेल. २) सन २०२४–२५ पासून राष्ट्रीय व्यवसाय आराखड्याप्रमाणे नविन अभ्यासक्रम लागू. ३) इलेक्ट्रॉनिक्स् विषय विनाअनुदानित असलेने त्याची फी वेगळी भरावी लागेल. ४) विना अनुदान तुकडीतील प्रवेशातील शासकीय नियमानुसार वाढीव फी भरावी लागेल.

## ● परीक्षा पध्दत ●

**अकरावी कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गासाठी परीक्षा पध्दत पुढीलप्रमाणे आहे.**

| सर्व भाषा विषयासाठी | | इतर विषयांसाठी (कला व वाणिज्य विभाग) | |
|---|---|---|---|
| **प्रथम सत्र** | **गुण** | **प्रथम सत्र** | **गुण** |
| १) घटक चाचणी | २५ | १) घटक चाचणी/सेमिनार/ट्युटोरीअल | २५ |
| २) प्रथम सत्र लेखी परीक्षा | ५० | २) प्रथम सत्र लेखी परीक्षा | ५० |
| **द्वितीय सत्र** | **गुण** | **द्वितीय सत्र** | **गुण** |
| १) घटक चाचणी | २५ | १) घटक चाचणी/सेमिनार/ट्युटोरीअल | २५ |
| २) द्वितीय सत्र लेखी परीक्षा तोंडी | ८०+२० | २) द्वितीय सत्र लेखीपरीक्षा तोंडी (२०) | ८०+२० |

**(Tentative Exam Schedule A. Y. 2024-25)**

| S.N. | Std. | Exam | Date |
|---|---|---|---|
| 1. | XII | UNIT TEST -01 | 28-07-2024 TO 30-07-2024 |
| 2. | XI | UNIT TEST -01 | 29-08-2024 TO 31-08-2024 |
| 3. | XII | TERMINAL | 21-10-2024 TO 28-10-2024 |
| | XI | TERMINAL | |
| 4. | XII | UNIT TEST - 02 | 02-12-2024 TO 04-12-2024 |
| 5. | XII | PRELIMINARY | 02-01-2025 TO 10-01-2025 |
| | XI | UNIT TEST - 02 | |
| 6. | XI | ANNUAL | 14-03-2025 TO 22-03-2025 |
| 7. | XI | PRACTICALS | 23-03-2025 TO 30-03-2025 |

### भूगोल विषयासाठी

| | |
|---|---|
| १) लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा ८०+२०=प्रात्यक्षिक | १०० |

## ● विज्ञान विभाग ●

| प्रथम सत्र | गुण | द्वितीय सत्र | गुण |
|---|---|---|---|
| १) घटक चाचणी | १५ | १) घटक चाचणी/सेमिनार /टयुटोरिअल | २५ |
| २) ट्युटोरीयल | १० | २) द्वितीय सत्र लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा ७०+३०= | १०० |
| | | **गणित विषयासाठी** | |
| १) प्रथम सत्र लेखी परीक्षा | ५० | १) द्वितीय सत्र लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा ८०+२०= | १०० |

## ● पर्यावरण शास्त्र ●

**पर्यावरण शास्त्र या विषयाची लेखी परीक्षा घेण्यात येणार नाही. या विषयाची गुणदान पध्दत खालीलप्रमाणे**

प्रोजेक्ट३० + जर्नल / सेमीनार २० = ५०

## ● आरोग्य व शारीरिक शिक्षण परीक्षा ●

११ वी आरोग्य व शारीरिक शिक्षणाची सक्तीची आहे. गुणदान पध्दत खालीलप्रमाणे

प्रथम सत्र – प्रात्यक्षिक २५ गुण = २५
द्वितीय सत्र – प्रात्यक्षिक २५ गुण = २५ } एकूण गुण ५०

## ● स्काऊट गाईड अभ्यासक्रम ●

कनिष्ठ महाविद्यालयातील मुला–मुलींसाठी हा अभ्यासक्रम उपलब्ध – रेल्वे व पोलीस भरतीसाठी उपयुक्त

## • १२ वी कला - वाणिज्य - विज्ञान •

**सामान्यत: इ. ११ वी साठी निवडलेले विषयच १२ वी साठी निवडावे लागतात.**

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे विषय आणि शाखा बदलण्याबाबतचे नियम.

१) अकरावीमध्ये विज्ञान शाखा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस १२ वी कला किंवा वाणिज्य शाखेत प्रवेश घेता येईल.

२) ११ वी वाणिज्य शाखेची परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यास १२ वी कला शाखेत प्रवेश घेता येईल.

३) कला शाखा घेतलेल्या विद्यार्थ्यास शाखा बदलता येणार नाही.

४) शाखा बदलत असताना फक्त ऐच्छिक विषय (Optional Subjects) बदलता येतील.

**५) यूनिफॉर्म आवश्यक आहे. (११ वी व १२ वी विज्ञान विभाग)**

६) बायोमेट्रीक अनिवार्य आहे. (विज्ञान विभागासाठी)

टीप : JEE व NEET साठी इ. ११ वी पासून खास मार्गदर्शनाची सोय आहे.

## शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ कनिष्ठ महाविद्यालय व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम वर्ग निहाय फी दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | फी चा तपशील | इयत्ता ११ वी कला/वाणिज्य | | इयत्ता ११ वी विज्ञान | | उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम इयत्ता ११ वी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Paying | EBC | Paying | EBC | Paying | EBC |
| १) | प्रवेश फी | १८ | - | १८ | - | २० | - |
| २) | सत्र फी | ३६ | - | ३६ | - | ४० | - |
| ३) | शिक्षण फी | २१६ | - | २१६ | - | २४० | - |
| ४) | प्रयोगशाळा फी | - | - | ७० | - | ८० | - |
| ५) | परीक्षा फी | २०० | २०० | २०० | २०० | १५० | १५० |
| ६) | विद्यार्थी स. निधी | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ |
| ७) | ओळखपत्र | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० |
| ८) | अनामत | - | - | - | - | - | - |
| ९) | अनामत (कार्यशाळा व प्रयोगशाळा) | - | - | - | - | - | - |
| १०) | ट्युटोरिअल्स व चाचण्या | १०० | १०० | १०० | १०० | ४० | ४० |
| ११) | विकास निधी | १०० | १०० | १०० | १०० | ५० | ५० |
| १२) | ई-सुविधा | १७० | १७० | १७० | १७० | १५० | १५० |
| | एकूण फी | ८८५ | ६१५ | ९५५ | ६१५ | ८३५ | ४३५ |

विनाअनुदानित तुकडी फी शासकीय नियमानुसार केंद्रीय प्रवेश प्रकियेतून विनाअनुदानित प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेसाठी रु.५१७०/- व विज्ञान शाखेसाठी रु.७१७०/- फी व कॉलेज फी भरावी लागेल.

**विनाअनुदानित तुकडी फी शासकीय नियमानुसार केंद्रीय प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना कला, वाणिज्य व विज्ञान शाखेसाठी उपसंचालक परिपत्रकानुसार भरणे आहे.**

## केंद्र सरकार पुरस्कृत

## उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम

## H. S. C. Vocational Courses

### वेळ : सकाळी ७.३० पासून

११ वी च्या विद्यार्थी-विद्यार्थिनीसाठी जून, १९९३ पासून खालील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम सुरू आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी | Technical Group (मराठी माध्यम) | जागा ३० |
| २) बँकिंग, फायनान्स सर्व्हिसेस अँड इन्शुरन्स | Commerce Group (मराठी माध्यम) | जागा ४० |
| ३) ऑफिस मॅनेजमेंट अँड अकौंटिंग ऑडिटिंग | Commerce Group (मराठी माध्यम) | जागा ४० |

* टीप : वरील अभ्यासक्रमाची परीक्षा एस.एस.सी बोर्डामार्फत घेतली जाते. तसेच महाराष्ट्र शासनाच्या नवीन नियमानुसार ५० टक्के जागा मुलींसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

## अभ्यासक्रम दोन वर्षाचा असून ११ वी व १२ वी साठी खालील विषय आहेत.

| इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी | बँकिंग, फायनान्स सर्व्हिसेस अँड इन्शुरन्स | ऑफिस मॅनेजमेंट अँड अकौंटिंग अँड ऑडिटिंग |
|---|---|---|
| १) इंग्रजी | १) इंग्रजी | १) इंग्रजी |
| २) मराठी | २) मराठी | २) मराठी |
| ३) जनरल फाऊंडेशन कोर्स | ३) जनरल फाऊंडेशन कोर्स | ३) जनरल फाऊंडेशन कोर्स |
| ४) पर्यावरण शिक्षण | ४) पर्यावरण शिक्षण | ४) पर्यावरण शिक्षण |
| ५) इले. टेक्नॉ. पेपर -१ EA | ५) बँकिंग, फायनान्स सर्व्हिसेस अँड इन्शुरन्स पेपर -१ (XA) | ५) ऑफिस मॅनेजमेंट अँड अकौंटिंग अँड ऑडिटिंग पेपर - १ (UA) |
| ६) इले. टेक्नॉ. पेपर -२ EB | ६) बँकिंग फायनान्स सर्व्हिसेस अँड इन्शुरन्स पेपर -२ (XB) | ६) ऑफिस मॅनेजमेंट अँड अकौंटिंग अँड ऑडिटिंग पेपर - २ (UB) |
| ७) इले. टेक्नॉ. पेपर -३ EC | ७) बँकिंग इन्शुरन्स सर्व्हिसेस अँड इन्शुरन्स पेपर -३ (XC) | ७) ऑफिस मॅनेजमेंट अँड अकौटिंग अँड ऑडिटिंग पेपर -३ (UC) |

* टीप : पर्यावरण शास्त्र आणि आरोग्य व शारीरिक शिक्षण परीक्षा बाबतची माहिती पान नं. ५ प्रमाणे राहील.

व्यवसाय अभ्यासक्रमामध्ये वेगवगेळ्या संस्था, कारखाने, कार्यालये, बँका, विमा कंपन्यांना भेटी देऊन व्यवसाय अभ्यासक्रमाची प्रात्यक्षिक माहिती समजावून दिली जाते. तसेच प्रत्यक्ष कामावर प्रशिक्षणाची सोय केली जाते.

व्यवसाय अभ्यासक्रम पूर्ण झालेनंतर व्यवसाय अभ्यासक्रमाचा स्वतंत्र दाखला दिला जातो.
त्याचा स्वयंरोजगारासाठी, नोकरीसाठी व स्वयंरोजगाराच्या कर्जासाठी उपयोग होतो.

## * व्यवसाय अभ्यासक्रमानंतर असणाऱ्या स्वयंरोजगाराच्या संधी पुढीलप्रमाणे.

### अ) इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी :-

१) इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांची विक्री व दुरूस्ती उदा. एल. सी. डी., एल. इ. डी., संगणक जोडणी, रेडिओ, डी. व्ही. डी., यु. एस. बी., सी. डी. प्लेअर इत्यादी.
२) इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचे उत्पादन व विक्री उदा. बॅटरी, एलिमिनेटर, व्होल्टेज स्टॅबिलायझर, इमर्जन्सी लाईट, म्युझिकल बेल, इलेक्ट्रॉनिक्स खेळणी, इनव्हर्टर, सोलर बॅटरी चार्जर, मोबाईल दुरुस्ती व देखभाल इत्यादी.
३) इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम पूर्ण झालेनंतर इलेक्ट्रॉनिक्स डिप्लोमा द्वितीय वर्षाला प्रवेश घेतेवेळी प्रथम प्राधान्य. तसेच बी. ए. भाग - १/बी. एस्सी. भाग - १ या वर्गासाठी प्रवेश मिळतो.
४) दोन वर्षाच्या कालावधीमध्ये एक महिना प्रशिक्षण (O. J. T.) दिले जाते.
५) या कोर्स अंतर्गत (P. O. T. ) प्रशिक्षण राबविले जाते.

### ब) बँकिंग फायनान्स सर्व्हिसेस अँड ईन्शुरन्स :-

१) हिशोबाच्या/जमा-खर्चाच्या वह्या लिहिण्याचा स्वतंत्र व्यवसाय करता येतो.
२) बँकिंग सेवेमध्ये प्राधान्य, पतसंस्थांमध्ये क्लार्क, ऑफिस सहाय्यक, विमा एजंट म्हणून संधी.
३) बी. कॉम. भाग - १/बी. ए. भाग -१ / B.C.A. भाग - १/ बी. बी. ए. भाग - १ या वर्गासाठी प्रवेश मिळतो.
४) दोन वर्षाच्या कालावधीमध्ये एक महिना बँक प्रशिक्षण (O. J. T.) दिले जाते.

### क) ऑफिस मॅनेजमेंट अँड अकौंटिंग अँड ऑडिटिंग :-

१) हिशोबाच्या/जमा-खर्चाच्या वह्या लिहिण्याचा स्वतंत्र्य व्यवसाय करता येतो.
२) आधुनिक कार्यालय व्यवस्थापनातील सेवेमध्ये प्राधान्य.
३) चार्टर्ड अकौटंट यांच्याकडे नोकरीची संधी.
४) बी. कॉम. भाग -१ /बी. ए. भाग -१/ B. C. A. भाग -१ / बी. बी. ए. भाग - १ या वर्गासाठी प्रवेश मिळतो.
५) दोन वर्षाच्या कालावधीमध्ये एक महिना प्रशिक्षण (O. J. T.) दिले जाते.

वरील सर्व विषयांच्या स्वतंत्र कार्यशाळा आहेत. बँकिंग व ऑफिस मॅनेजमेंट विषयाच्या विद्यार्थ्यांना कार्यशाळेमध्ये कॅलक्युलेटर, इलेक्ट्रॉनिक्स प्रिंटर कॅलक्युलेटर, फ्रँकिंग मशीन, कॉम्प्युटर, कॅश बुक, लेजर, डेली कॅश बुक, व्हौचर फाईल इत्यादी बाबींवर खास प्रशिक्षण दिले जाते.

**महत्त्वाची सूचना :** उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाकडील इ. ११ वी वर्गासाठी परीक्षा पध्दत पुढीलप्रमाणे आहे.

| प्रथम सत्र | संख्या | गुण | द्वितीय सत्र | संख्या | गुण |
|---|---|---|---|---|---|
| घटक चाचणी | १ | २५ | घटक चाचणी | १ | २५ |
| प्रथम सत्र लेखी परीक्षा | १ | ५० | द्वितीय सत्र लेखी परीक्षा | १ | ८० |
| | | | द्वितीय सत्र प्रात्यक्षिक परीक्षा | १ | २० |

प्रत्येक विषयात उत्तीर्ण होण्यासाठी दोन्ही सत्रातील एकूण गुणांपैकी ३५% गुण मिळविणे आवश्यक आहे.

## राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तर

आमच्या महाविद्यालयामध्ये कनिष्ठ विभागाकडे ''राष्ट्रीय सेवा योजना'' कार्यरत आहे. सदर योजनेअंतर्गत फक्त २५ विद्यार्थ्यांची त्यांच्या अंगी असणाऱ्या विविध गुणाद्वारे निवड केली जाते. या योजने अंतर्गत विद्यार्थ्यांला आपल्या वैयक्तिक व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच राष्ट्रसेवा करणेची संधी लाभते. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये सहभागी होण्याची संधी मिळते. त्याचबरोबर वर्षभर विविध सहशालेय उपक्रम पार पाडले जातात. त्यामध्येही आपली गुणवत्ता सिध्द करणेची संधी मिळते. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्याला समाजाबद्दल रुची निर्माण होते व भविष्यात त्याचा उपयोग विविध प्रशासकीय पदावरती काम करत असताना होत असतो.

संपर्क : पी. एन. शिंदे. मो. नं. ७०२८९२४४५७

## एन. सी. सी. विभाग

ज्या विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षणाची आवड आहे. त्यांना एन. सी. सी. मध्ये भाग घेता येईल. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील ५६ + मुलांना व मुलींना ५६ MAH BN NCC मध्ये प्रवेश दिला जातो.

संपर्क : लेफ्ट. डॉ. दत्तात्रय नरळे. मो. नं. ९५६१८९२१२९

## ग्रंथालय

गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयाचे 'शिक्षणमहर्षि प्राचार्य एम. आर. देसाई' ग्रंथालय विविध विषयातील जुन्या व नव्या ग्रंथानी समृध्द आहे. इंग्रजी, मराठी, हिंदी, संस्कृत इत्यादी भाषेतील विविध विषयांवरील जुन्या दुर्मिळ ग्रंथांचा यात समावेश आहे. या ग्रंथालयात ८१६६५ पेक्षा अधिक विविध विषयावरील ग्रंथ उपलब्ध असून वरचेवर ह्यात भर पडत आहे. ग्रंथालयात विविध विषयांवरील ३० नियतकालिके व ९ वर्तमान पत्रे उपलब्ध आहेत. ग्रंथालयात इन्फ्लीबनेट तर्फे पुरविण्यात येणारी एन लिस्ट सेवा सुविधा उपलब्ध आहे. एन–लिस्ट या सेवेद्वारे ९७००० + ई–बुक्स ६००० + व ई–जर्नल्सची वाचकांना उपलब्ध आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ आणि निरंतर शिक्षण विभागाचा 'ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम' हा तीन महिने मुदतीचा अभ्यासक्रम महाविद्यालयाच्या ग्रंथालयामार्फत चालविला जातो. या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक पात्रता इ. १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. विद्यार्थी आपल्या नेहमीच्या अभ्यासक्रमाबरोबर ह्या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतात. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यांची माध्यमिक शालेय ग्रंथालय तसेच शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालय येथे ग्रंथपाल पदावर नियुक्ती होऊ शकते.

ग्रंथालयात दरवर्षी ग्रंथमहोत्सव, वाचन प्रेरणा दिन व मराठी भाषा संवर्धन पंधरवडा इत्यादी उपक्रम राबविले जातात. वेळोवेळी ग्रंथप्रदर्शनही भरविले जाते.

## क्रीडा विभाग

१) कॉलेजचे संभाजी नगर येथील सुसज्ज क्रिडांगण.
२) मुलींसाठी स्वतंत्र जीम.
३) खेळाडूंसाठी आहार तज्ञांचे मार्गदर्शन.
४) सांघिक व वैयक्तिक खेळाडूंना विशेष मार्गदर्शन.
५) खेळाडूंना राज्य व राष्ट्रीयस्तरावर चमकण्याची संधी.
६) राज्य व राष्ट्र स्तरावरील सहभागी खेळाडूंना शासकीय नियमानुसार सवलत.
७) कॉलेजकडून राज्य व राष्ट्रीय खेळाडूंना विशेष स्कॉलरशिपची सोय.

## शॉर्ट टर्म कोर्सेस

लोकविकास केंद्र–शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व महाराष्ट्र शासन अंतर्गत विविध विभागामार्फत आमच्या महाविद्यालयातील खाली नमूद केलेल्या व्यवसाय, स्वयंरोजगार, रोजगार आणि कौशल्य वर्धनाचे अभ्यासक्रम सुरू आहेत.

| अ. क्र. | प्रशिक्षण वर्गाचे नाव | कालावधी | प्रवेश पात्रता | प्रशिक्षण शुल्क | मूल्यमापन शुल्क | प्रवेश संपर्क |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | उद्यानविद्या व रोपवाटीका व्यवस्थापन | १ वर्ष | १० वी पास व तत्सम | रु. २,७४०/– | रु. २६०/– | प्रा. डॉ. आर. पी. जाधव (वनस्पतीशास्त्र विभाग) |
| २) | औषधी वनस्पती ओळख व संवर्धन | ३ महिने | कोणीही इच्छुक | रु. ८००/– | रु.२००/– | प्रा. डॉ. आर. पी. जाधव (वनस्पतीशास्त्र विभाग) |
| ३) | लॅबोरेटरी मॅनेजमेंट अँड वॉटर ॲनालिसिस | ३ महिने | १२ वी सायन्स किंवा तत्सम | रु. १५००/– | रु. १७५/– | प्रा. पी. पी. सुतार (रसायनशास्त्र विभाग) |
| ४) | लॅबोरेटरी मॅनेजमेंट अँड सॉईल ॲनालिसिस | ३ महिने | १२ वी सायन्स | रु.१५००/– | रु. १७५/– | प्रा. पी. पी. सुतार (रसायनशास्त्र विभाग) |
| ५) | लॅबोरेटरी मॅनेजमेंट अँड फूड ॲनालिसिस | ३ महिने | १२ वी सायन्स किंवा तत्सम | रु. १५००/– | रु.१७५/– | प्रा. पी. पी. सुतार (रसायनशास्त्र विभाग) |
| ६) | ग्रंथालय व्यवस्थापन | ३ महिने | १० वी पास किंवा तत्सम | रु. १,१७५/– | ---- | श्री. डी. व्ही. किलकिले (ग्रंथालय विभाग) |
| ७) | सी. सी. इन गार्डनर व्यवसाय परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई | ६ महिने | ७ वी पास | रु. २,७००/– | रु. ३००/– | प्रा. एस. डी. मोहिते प्रा. एस. एम. साबळे (एच. एस. व्ही. सी.) |
| ८) | ग्रामीण पत्रकारिता व जनसंवाद | ६ महिने | १० वी पास | रु. १०००/– | रु. ३७५/– | एस. आर. गडदे एस. यू. माने |

## U. G. C. Approved Career Oriented Courses

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Spoken and Communicative English | 1 years | Any Senior College Student | Rs. 500/- | - | Dr. C.R. Chougule (English Dept.) |
| 2. | Certificate Course in Retailing | 1 years | Any Senior College Student | Rs. 500/- | - | Prof. Dr. A. A.Kulkarni (Commerce Dept.) |
| 3. | Certificate Course in Horticulture & Nursery Management | 1 years | Any Senior College Student | Rs. 500/- | - | Prof. R. P. Jadhav (Botany Dept.) |




प्राचार्य असोसिएशनच्यावतीने कुलगूरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रा. डॉ. मंजिरी मोरे यांचा सत्कार करताना व्यासपीठावर इतर मान्यवर



आदर्श पब्लिक स्कूल विटा, येथे वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण समारंभ या याप्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. मंजिरी मोरे यांचा सत्कार करताना सौ. राजश्री पाटील, माजी आमदार सदाशिवराव पाटील, माजी नगराध्यक्ष वैभवदादा पाटील व इतर मान्यवर








मिस व मिस्टर गोखले ... २०२३-२४

एन. सी. सी मुले व मुली







इंग्रजी विषय - नाविनयपूर्ण शैक्षणिक उपक्रमात भाग घेतलेले विद्यार्थी



शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर संचलित

# गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर